माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले द्वितीय अपील

अपील क्रमांक : ४९०/२०२१

**अपिलार्थी, श्री. भास्कर भाऊरावजी येंगळे**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा लेखापाल,
कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूर, ता. भिवापूर जि. नागपूर

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूर, ता. भिवापूर जि. नागपूर

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.११.२०२२

अपीलकर्ता : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १८.०९.२०२० | १५.१०.२०२० | १२.११.२०२० | १७.१२.२०२० |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८.०९.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " सन २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या वर्षीचा अंकेक्षण अहवाल व संस्थेने दोष दुरुस्ती करुन रिपोर्ट पाठविला त्या सर्वांच्या प्रतीची " माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र शासन प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.७१/१८ (रं.व.का.) दि. १४ ऑक्टोबर २०१९ अन्वये परिपत्रकानुसार आलेल्या अर्जाची एजंटाकडून किंवा त्यांच्या मार्फत शासनास करण्यात आलेल्या अर्जाची सामान्यत: दखल घेण्यात येऊ नये, अशी तरतुद करण्यात आली आहे. यामुळे आपला अर्ज या कार्यालयाचे स्तरावर खारीज करण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक १२.११.२०२० रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती न दिल्यामुळे" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले.



Scanned with OKEN Scanner

त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.१२.२०२० रोजी सुनावणी घेवून दिनांक २४.१२.२०२० अन्वये खालीलप्रमाणे सविस्तर आदेश पारीत केले आहे.

"अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूर यांचेकडे मागितलेली आहे. तथापि कृषी उत्पन्न बाजार समितीस माहिती अधिनियम लागू होतो किंवा कसे या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह अपील (C) --------------CC 3596/2016 कृषी उत्पन्न बाजार समिती विरुध्द मुख्य माहिती आयुक्त आणि इतर या प्रकरणात दि. २९.०२.२०१६ रोजी स्थगिती आदेश दिले आहेत. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयामध्ये या प्रकरणात निर्णय अंतीम होईपर्यंत कृषी उत्पन्न बाजार समिती संदर्भात पुढील निर्णय घेणे यथोचित ठरणार नाही. ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अपीलार्थी सर्वोच्च न्यायालयाचा अंतीम निर्णय आल्यानंतर प्रकरणात नव्याने माहिती अर्ज दाखल करुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेऊ शकतात असा आदेश राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद ने दिलेला आहे. त्यानुसार आपला अर्ज वरील विवेचनानुसार निकाली काढण्यात येत आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक १०.०२.२०२१ रोजी " माहिती मिळाली नाही" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १५.११.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, श्री. विजय अमृतराव चौधरी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री. रामकृष्णा गणपतराव गोंगल उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती भिवापूर यांचेकडे मागितलेली आहे. तथापि कृषी उत्पन्न बाजार समितीस माहिती अधिनियम लागू होतो किंवा कसे या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह अपील (C) --------------CC 3596/2016 कृषी उत्पन्न बाजार समिती विरुध्द मुख्य माहिती आयुक्त आणि इतर या प्रकरणात दि. २९.०२.२०१६ रोजी स्थगिती आदेश दिले आहेत. सदरचे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये या प्रकरणात निर्णय अंतीम होईपर्यंत कृषी उत्पन्न बाजार समिती संदर्भात पुढील निर्णय घेणे यथोचित ठरणार

नाही. याबाबतीत मा. राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठाने श्री. बालाजी बंडे विरुध्द कृषी उत्पन्न बाजार समिती मुखेड, जि. नांदेड, अपील क्र.७०६९/२०१८ यात दिनांक ०२.०९.२०१९ रोजी याच प्रकारचा निर्णय दिलेला असल्याचा लेखी खुलासा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आलेला आहे. ही बाब लक्षात घेता, मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय प्राप्त होताच अपिलार्थी तसेच संबंधित प्राधिकरण त्याअनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याच्या निर्देशासह वरील व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १५.११.२०२२

जावक क्रमांक 2534 दिनांक 24 APR 2023